## DMK JAOLI BANK
## दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.

(नोंदणी क्र. बी. ओ. एम. / बी. एन. के. / १२७ ऑफ १९७३)
प्रशासकीय कार्यालय : ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई-४०० ००४.
दूर. क्र.: +९१ २२-२३८२२७७७/ +९१ २२ २३८७०४३७. फॅक्स : +९१ २२-२३८५०५१४
Website: www.jaolibank.in Email ID : hoadmin@jaolibank.in, hoscr@jaolibank.in

# ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येतेकी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ आणि कोव्हीड- १९ महामारीच्या प्रकोपाचे पार्श्वभुमीवर नागरी सहकारी बँकांना सन २०२०-२०२१ या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा Online/VC/OAVM (Other Visual Means) द्वारे आयोजित करण्याबाबत महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांनी दि. ३० जूलै २०२१ रोजी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार **बँकेची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, सोमवार दिनांक २७.०९.२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता श्री सावता माळी भुवन ट्रस्ट,१६३, डॉ. आंबेडकर रोड, भायखळा (पुर्व), मुंबई- ४०० ०२७** येथे Online / व्हीडीओ कॉन्फरसिंग (VC) / ओएव्हिएम (Other Audio Visual Means) द्वारे आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.

### ❖ सभेपुढील विषय ❖

१. दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी संपन्न झालेल्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणीत केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करून त्यास स्विकृती देणे.
३. वैधानिक लेखा परिक्षकांचा सन २०२०-२१ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.
४. माहे ३१ मार्च, २०२१ अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जाची नोंद घेणे.
५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६. आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्व मान्यतेने करावयाच्या वैधानिक लेखापरिक्षकांचे नियुक्तीबाबत नोंद घेणे. आणि त्यांना अदा करावयाचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळ सभेस प्रदान करणे.
७. भारतीय रिझर्व्ह बँक व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परवानगीस अधिन राहुन बँकेच्या मुख्य कार्यालय / गोळदेऊळ शाखेच्या स्वमालकीच्या इमारतीची/ जागेची विक्री करणे व मुख्य कार्यालयाकरीता बँकेची नोंदणी असलेल्या मुंबई शहर जिल्ह्यात स्वमालकी / भाडे करारावर नवीन इमारत/ जागा खरेदी करण्यास मान्यता देणे.
८. भारतीय रिझर्व बँक व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परवानगीस अधिन राहुन बँकेच्या गोळदेऊळ शाखेकरीता शाखापरिसरात स्वमालकी / भाडे करारावर नवीन इमारत / जागा खरेदी करण्यास मान्यता देणे.
९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे दुरुस्तीस मान्यता देणे.
१०. सन २०२० २१ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे.
११. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीत कर्जदारांकडुन करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधीत ठेऊन निर्लेखन करण्यास मान्यता देणे.
१२. Online/VC/OAVM (Other Visual Means) द्वारे आयोजीत ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे.
१३. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे संमतीने**
**एस. रंगनाथन**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२.०९.२०२१**

### विशेष सुचनाः

१. सभेच्या नियोजीत वेळेत म्हणजेचे सकाळी १०.३० वाजेपर्यंत गणपुर्ती न झाल्यास सभा तहकुब केली जाईल व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी व्हीडीओ Online/VC/OAVM (Other Visual Means) द्वारे सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणपुर्ती व वेगळ्या सुचनेची आवश्यकता राहणार नाही. जेवढे सभासद बँकेने या सर्वसाधारण सभेकरीता पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजतांनाग्राह्य धरली जाईल.
२. Online/VC/OAVM (Other Visual Means) द्वारे आयोजीत करण्यात आलेल्या बँकेच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक वर दि. २१.०९.२०२१ पर्यंत या सुचना पत्रासह लॉगीनकरीता लिंक पाठविण्यात येईल.
३. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन वर लॉगीन लिंक डाऊनलोड करुन त्याद्वारे सभासद या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.
४. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया दि. २७.०९.२०२१ रोजी पूर्ण होईल. त्याबाबत अधिक तपशील खालील प्रमाणे आहे;
अ) दि. २७.०९.२०२१ रोजी सभेच्या निर्धारीत वेळेपुर्वी १५ मिनिटे अगोदर म्हणजे १०.१५ पासुन लॉगीन लिंक चालू करण्यात येईल.
ब) दि. २७.०९.२०२१ रोजी सर्वप्रथम सभेच्या विषय पित्रकेतील विषय सभेपुढे मांडण्यात येतील.
क) सभेच्या विषय पित्रकेतील ठराव मंजुरीबाबतचा निर्णय लिंकवर / संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल.
५. मा. सहकार खात्याने निर्गमीत केलेल्या दि. ३०.०७.२०२१ रोजीच्या पत्रानुसार व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Mean) द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सुचना केलेली आहे. त्या अनुषंगाने, बँकेने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझीटरी लिमिटेड (NSDL) यांची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. काही अनपेक्षीत परिस्थीतीत उदा. तांत्रीक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास तांत्रीक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज सुरु केले जाईल याची सभासदांनी नोंद घ्यावी.
६. सभासदांना लॉगीन लिंकबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास evoting@nsdl.co.in या ई-मेल आयडीवर अथवा १८००-१०२०-९९०/१८००-२२-४४-३० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यांचेकडुन सदर बाबत काही प्रश्न/अडचणी असतील तर त्या सोडविल्या जातील. सभासदांच्या इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील तर त्या सोडविणे शक्य होणार नाही. तसेच सभासदांना बँकै संदर्भात अथवा विषय पत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्यांचे निराकरण या एजन्सीमार्फत दिलेल्या दुरध्वनी क्रमांक व मेल आयडीवर होणार नाही.
७. सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, उपविधी दुरुस्तीचा मसुदा बँकेच्या वेबसाईट www.jaolibank.in वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.
८. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत विधायक स्वरुपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि. २०.०९.२०२१ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात अथवा hoscr@jaolibank.in केवळ या ई-मेलवर आयडी वर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल.
९. भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी खातेदारानी के वाय.सी. (K.Y.C.) बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे. किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करून घ्यावी, त्याकरीता आपल्या शाखेत संपर्क करावा.
१०. सदर वार्षीक सर्वसाधारण सभेत सहभागी होणेसाठी आपला सभासद क्रमांक, नाव, ई मेल आयडी व मोबाईल क्रमांक hoshares@jaolibank.in या E-mail Address वर किंवा बँकेच्या शेअर्स विभाग अथवा कोणत्याही शाखेत कळवावे हि विनंती.